# पारिजात

***Nyctanthes arbor-tristis*** Family**: Oleaceae**

**विविध भाषांमधील नावे:** मराठी: पारिजातक, प्राजक्त; हिंदी: हर सिंगर, शेफाली; संस्कृत: पारिजात; English: Coral Tree, Night Flowering Jasmine

**Morphology:**

Small tree up to 10 meters with greyish flaky bark; leaves simple, opposite; flowers fragrant, 8-10 lobed, corolla white with orange -red center, tube dark orange -red; fruit flat, rounded, heart shaped.





**वनस्पतीचे वर्णन:**

एक सुंदर सुवासिक फुलाचा मध्यम छोटा वृक्ष ४ ते ५ मीटर उंचीपर्यंत वाढतो. याला अनेक फांद्या असतात. झाडाची साल करड्या रंगाची असून याची पाने खरखरीत व कात्रेदार असतात. हा अर्धपानझडी वृक्ष आहे. याला केशरी देठ असलेली फुले येतात. या फुलांचे सडे झाडाखाली पडते. त्याचा सुगंध आजूबाजूला दूरवर पसरतो व वातावरण प्रसन्न होते. यांची बी चपटी असते.

**बहर येण्याचा कालावधी:** ऑगस्ट ते डिसेंबर

**औषधी उपयोग:**

पाने, साल, बिया औषधात वापरतात. जंत, मलेरिया, कफ , दमा , गालगंड , सर्पदंश, गजकर्ण, इ. आजारांवर याच्या वेगवेगळ्या भागाचा (पाने, साल, बी) उपयोग केला जातो. पारिजातकाची फुले हिृदयरोगासाठी गुणकारी आहेत. कोरडा खोकला, श्वसनासंबंधित आजार, शारीरिक वेदना, मूळव्याध, संधिवात यांसारख्या रोगांमध्ये प्राजक्त उपयोगी आहे. पारिजात फुलाच्या तेलामध्ये अँटी ॲलर्जिक गुणधर्म असतात. याच कारणामुळे कित्येक ब्युटी प्रोडक्ट्समध्ये, बॉडी सीरममध्ये इत्यादी उत्पादनांमध्ये या फुलाच्या तेलाचा वापर केला जातो. पारिजातच्या बिया, पाने आणि फुलांमध्ये अँटी-फंगल आणि अँटी-बॅक्टेरिअल गुणधर्म देखील असतात. ज्यामुळे त्वचेशी संबंधित समस्या दूर होण्यास मदत मिळते. एखादी जखम भरण्यासाठीही या फुलाचा लेप वापरला जातो.

**लागवड :**

पारिजातकाची लागवड बियांपासून किंवा दाब कलमापासून केली जाते. साधारणपणे ३०-४५ दिवसांनी रोपे जमिनीमध्ये अथवा कुंडीमध्ये लावली जातात. लागवडीनंतर ६-८ महिन्यामध्ये फुले / बहर येण्यास सुरुवात होते. बिया रुजण्याचे प्रमाण खूप कमी असल्यामुळे याची लागवड डोळे असणाऱ्या खोडाच्या छोट्या कांड्यांपासून किंवा कलाम पासून केली जाते. या वनस्पतीची पाने जनावरे खात नाहीत त्यामुळे याची वाढ चांगल्या डेरेदार प्रकारे होते.